**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग , लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.**
दुरध्वनी क्र.०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं-०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी क्र- **dydpune@gmail.com** वेब साईट- **www.dydepune.com**

---

जा.क.शिउसं/उमाशि-३/११ वी ऑनलाईन/२०१५/१८९२० दिनांक 29 SEP 2015

**प्रति,**

प्राचार्य (सर्व),
उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे.

**विषय : महाविद्यालयीन स्तरावरील इ.११ वी चे उर्वरित प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकनुसार केलेल्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : १. जा.क.उमाशि-१/पुवि/पीआयएल/१२७/२०१५-१६ शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचा दिनांक ०२.०९.२०१५ चा आदेश.
२. जा.क.उमाशि-१/११ वी ऑनलाईन/पुवि/२०१५ शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचा दिनांक ०४.०९.२०१५ रोजी दिलेले वेळापत्रक.
३. जा.क.शिउसं/उमाशि-३/११ वी ऑनलाईन/२०१५/१८१८१ शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचा दिनांक १४.०९.२०१५ चा आदेश.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, इ ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेंर्तगत महाविदयालयीन स्तरावर रिक्त जागांवर गुणवत्तेप्रमाणे करावयाच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक संदर्भ कमांक ३ च्या पत्रानुसार दिनांक २९.०९.२०१५ पर्यंत प्रवेश देऊन जागा भरून काढाव्यात व प्रवेशाची कार्यवाही पूर्ण करावी व प्रवेशाचा संपूर्ण अहवाल या कार्यालयास दिनांक ३०.०९.२०१५ पर्यंत सादर करण्यात यावा असे कळविण्यात आलेले आहे.

तरी इ ११ वी ला आपणास मंजूर असलेल्या तुकडयांच्या सर्व प्रवेश क्षमते नुसार ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेर्तगत महाविदयालयीन स्तरावर गुणवत्तेप्रमाणे व प्रचलित नियमानुसार असलेल्या रिक्त जागांवर ऑनलाईन पध्दतीने प्रवेश दिनांक २९.०९.२०१५ पर्यंत प्रवेश देऊन सर्व रिक्त जागा भरून काढाव्यात व प्रवेशाची कार्यवाही पूर्ण करावी. प्रवेशाचा संपूर्ण अहवाल या कार्यालयास दिनांक ३०.०९.२०१५ पर्यंत सादर करण्यात यावा.

उर्वरित रिक्त जागांवरील प्रवेशासंदर्भातील सर्व सूचना महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर वेळोवेळी प्रसिध्द कराव्यात दिनांक २९.०९.२०१५ नंतर इ.११ वी चे कोणतेही प्रवेश देऊ नयेत. तसेच विद्यार्थी व पालकांना या कार्यालयाकडे पाठविण्यात येऊ नये.

MRaut 28.9.15
(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
प्र.सहाय्यक शिक्षण संचालक,
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
पुणे विभाग, पुणे – १